# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः31.08.2024** **वारःशनिवार**

---

1. महाराष्ट्रातील वाढवण बंदरासह विविध विकास कामांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ
2. वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचं आर्थिक चित्र बदलेल -पंतप्रधानांचा विश्वास
3. संरक्षण क्षेत्रातील कर्मचारी आणि कुटुंबियांना मदत आणि सेवा देण्याच्या उद्देशानं नमन प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात
4. देशाच्या गाभा क्षेत्रातील उत्पादनांमध्ये 6 टक्क्यांहून अधिक वाढ आणि
5. पॅरालिंपिक्स स्पर्धेत नेमबाज अवनी लेखराची सुवर्ण कामगिरी

**पंतप्रधान वाढवण**

वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचं आर्थिक चित्र बदलणार असून वाढवण बंदराच्या पायाभरणीचा दिवस हा देशाच्या प्रगतीच्या वाटचालीतला ऐतिहासिक दिवस आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदराच्या पायाभरणीसह अन्य विकासकामांचं उद्घाटन आणि भूमीपूजन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या पुतळा दुर्घटनेबाबत खेद व्यक्त केला आणि शिवरायांची तसंच शिवभक्तांची माफी मागितली. गेल्या दशकात देशाच्या किनारपट्टीवरील भागाच्या विकासानं अभूतपूर्व गती घेतली आहे असं मोदी यांनी सांगितलं. आज सगळं जग वाढवण बंदराकडे अपेक्षेनं पाहात असल्याचं सांगत पंतप्रधान म्हणाले.......

या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते स्थानिक मासेमारांना बोटीवर लावण्याच्या ट्रान्स्पाँडर अर्थात संपर्क व्यवस्था साधनांचं वितरण करण्यात आलं. इस्रोनं विकसित केलेले हे ट्रान्स्पाँडर देशातल्या 1 लाख बोटींवर लावले जाणार आहेत. यावेळी मोदींच्या हस्ते काही मासेमारांना किसान क्रेडिट कार्डचंही वाटप करण्यात आलं. या कार्यक्रमाला केंद्रिय जहाजबांधणी, बंदर आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. वाढवण बंदर राज्यासाठी प्रगतीचं नवं शिखर ठरेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. तर वाढवण बंदरामुळे आत्मनिर्भर आणि विकसित भारतात महाराष्ट्राची भूमिका आणखी मजबूत होईल, असं केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी सांगितलं.

**पंतप्रधान फिनटेक**

भारताच्या वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रामुळे जगभरातल्या लोकांची जीवनपद्धती सुलभ होणार असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. जागतिक वित्तीय तंत्रज्ञान अर्थात फिनटेक महोत्सवात ते काल मुंबईत बोलत होते. भारतानं ज्या गतीनं आणि ज्या प्रमाणात वित्त क्षेत्रातलं तंत्रज्ञान अंगीकारलं आहे त्याला जगात तोड नाही. जगातले निम्म्यापेक्षा जास्त तत्काळ होणारे डिजिटल अर्थव्यवहार भारतात होतात असं पंतप्रधान म्हणाले. आर्थिक सेवांचं सार्वत्रिकीकरण होण्यात फिनटेकनं महत्त्वाची भूमिका बजावली आहे. डिजिटल व्यवहारांमुळे आर्थिक व्यवहारांमधली पारदर्शकता वाढली आणि समांतर अर्थव्यवस्थेला खीळ बसली. फिनटेकनं आर्थिक व्यवहारांमध्ये आणलेले बदल

केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित नाहीत. त्यांचा सामाजिक परिणाम खूप व्यापक आहे असं पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं. फिनटेक क्षेत्रातल्या अत्याधुनिक कल्पनांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनालाही यावेळी मोदी यांनी भेट दिली.

**<u>पियुष-फिनटेक</u>**

फिनटेक क्षेत्राने नैतिकता वापरुन पैशांचा गैरव्यवहार आणि आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्तेचा कसा उपयोग करता येईल याकरिता प्रयत्न करावेत असं आवाहन केंद्रिय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी फिनटेक क्षेत्राला केलं आहे. मुंबईत आयोजित फिनटेक महोत्सव 2024 ला संबोधित करताना ते बोलत होते. देशातील फिनटेक क्षेत्राने भारताला गौरव मिळवून दिला आहे असे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी बोलताना काढले.

**<u>लष्कर-नमन</u>**

संरक्षण क्षेत्रातील निवृत्तीवेतनधारक, तज्ञ आणि त्यांच्या कुटुंबियांना सर्व प्रकारची मदत आणि सेवा देण्याच्या उद्देशानं नमन या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात संरक्षण दलाकडून काल करण्यात आली. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि आर्मी वाइव्हज वेलफेअर असोसिएशनच्या अध्यक्षा सुनीता द्विवेदी या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित होत्या. नवी दिल्ली, जालंधर, लेह, डेहराडून, लखनौ, जोधपूर, बेंगडुबी, गोरखपूर, झांसी, सिकंदराबाद, सौगोर, गुंटूर, अहमदाबाद आणि बंगळुरू यासह संपूर्ण देशांत महत्त्वाच्या ठिकाणी 14 ही सेवा केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. पुढील 2 ते 3 वर्षांत प्रकल्पाचा विस्तार करण्याच्या उद्देशानं 200 केंद्रं स्थापन करण्याचं सैन्यदलाचं उद्दिष्ट आहे.

**<u>गाभा-क्षेत्र</u>**

यावर्षी देशाच्या गाभा क्षेत्रानं 6 टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली आहे. अशी माहिती वाणिज्य मंत्रालयानं काल जारी केलेल्या अहवालात देण्यात आली आहे. औद्योगिक उत्पादन निर्देशांकातील प्रगतीत सिमेंट, कोळसा, खनिज तेल, विद्युत, खतं, नैसर्गिक वायु, खनिज शुध्दीकरण क्षेत्र आणि पोलाद अशा क्षेत्रातील उत्पादनांचा एकत्रित 40 टक्के वाटा आहे. पोलाद उत्पादनातील वाढ तीन महिन्यांतील उच्चांक दर्शवत 7 टक्क्यांपेक्षा अधिक असून सिमेंट उत्पादन गेल्या चार महिन्यातील सर्वाधिक साडेपाच टक्क्यावर गेलं आहे, ही वाढ बांधकाम क्षेत्रातील प्रगतीचा आलेख दर्शवते. या वर्षी चांगला पाऊस झाल्यानं खरीप पेरणीला गती मिळाली आहे. पेट्रोलियम उत्पादनात आठ महिन्यांतील उच्चांक साडेसहा टक्क्याहून अधिक, तर खतांचे उत्पादन सात महिन्यांतील उच्चांक नोंदवत 5 टक्क्यांपेक्षा अधिक आहे. यावर्षी जुलैमध्ये कोळसा उद्योगाचं उत्पादन 6 पुर्णांक 8 टक्क्यांनी वाढलं असून वीज निर्मितीमध्ये 7 टक्क्यांनी वाढ नोंदवली आहे.

**<u>GDP</u>**

आर्थिक वर्ष 2024-25 च्या पहिल्या तिमाहीत देशाचा सकल देशांतर्गत उत्पादनाचा दर 6 पुर्णांक 7 टक्के राहिला आहे. सांख्यिकी मंत्रालयानं यासंदर्भात काल आकडेवारी जाहीर केली. तरुण कर्मचाऱ्यांना दर्जेदार रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण असेल्या उत्पादन क्षेत्रानं 7 टक्क्यांची वाढ नोंदवली आहे, तर बांधकाम आणि वीज क्षेत्राने या तिमाहीत दुहेरी अंकी वाढ नोंदवली आहे. पहिल्या तिमाहीत खाजगी क्षेत्र, घरगुती खर्च आणि स्वयंसेवी संस्थांसाठीचा अंतिम उपभोग खर्च आणि एकंदर स्थिर भांडवल निर्मितीमध्ये अनुक्रमे 7 पुर्णांक 4 टक्के आणि 7 पुर्णांक 5 टक्के इतकी वाढ नोंदवली आहे.

**<u>धर्मेंद्र प्रधान</u>**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे लाभ देशातील प्रत्येक मुलाला मिळणं ही केंद्र सरकारची वचनबध्दता असल्याचं केंद्रिय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री यांना लिहीलेल्या पत्रांत म्हटलं आहे. तामिळनाडू राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा योजनेचा लाभ झाला आहे. नवीन शैक्षणिक धोरण तमिळनाडूच्या

शाळांमध्ये तमिळ शिकविण्याच्या कल्पनेला पूर्ण समर्थन देते असं या पत्रांत अधोरेखित करण्यात आलं आहे. तमिळ ही जगातील सर्वात जुनी अभिजात भाषा आहे आणि ही राष्ट्रीय अभिमानाची बाब आहे. असंही प्रधान यांनी आपल्या पत्रांत नमूद केलं आहे. पीएमश्री योजनेअंतर्गत सांमजस्य करार करण्यासंदर्भात तामिळनाडू राज्य सरकारनं दिलेल्या प्रतिसादाला उत्तर देताना प्रधान यांनी हे पत्र लिहीलं आहे.

**चंपाई सोरेन**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी काल रांची इथं आयोजित  कार्यक्रमांत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. झारखंड मुक्ती मोर्चाचे माजी नेते बाबूलाल सोरेन यांचा मुलानेही भाजपात प्रवेश केला. या कार्यक्रमाला बाबुलाल मरांडी, शिवराज सिंह चौहान आणि हिमंता बिस्व सरमा यांच्यासह भाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. राज्यातील संथाल परगणा भागात बांग्लादेशातील स्थलांतरितांची संख्या पाहता आदिवासींची ओळख आणि अस्तित्व टिकवण्यासाठी आपण भाजपात प्रवेश केल्याचं सोरोन यांनी यावेळी बोलताना सांगितलं. या स्थलांतरितांमुळे राज्याची लोकसंख्येत बदल झाला आहे. अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

**ॲथलेटिक्स**

20 वर्षांखालील जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारताच्या 17 वर्षीय आरतीनं महिलांच्या 10 हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत 44 मिनिटे 39 सेकंदांची विक्रमी कामगिरी करत कास्यपदक पटकावलं. आरतीनं यावर्षी मार्चमध्ये लखनौ इथं झालेल्या २० वर्षाखालील  राष्ट्रीय फेडरेशन करंडक अजिंक्यपद स्पर्धेत 47 मिनिटे 21 सेकंदांचा आपलाच राष्ट्रीय विक्रम मोडला. या स्पर्धेत, चीनच्या झुओमा बैमाला सुवर्ण, तर मेलिंग चेनला रौप्यपदक मिळालं.

**पॅरालिम्पिक**

पॅरीसमध्ये सुरू असलेल्या पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धेत  भारतीय नेमबाज अवनी लेखरा हिनं 10 मीटर एअर रायफल प्रकारात विक्रमी 249 पूर्णांक 7 दशांश गुणांची कमाई करत सुवर्णपदक पटकावलं. याच स्पर्धेत मोना अगरवालनं कास्य पदक मिळवलं. शंभर मीटर धावण्याच्या टी 35 स्पर्धेत भारताच्या प्रीती पाल हिनं कास्य पदक मिळवलं,

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.